Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March-2018

Vol. 5 Issue 1

Chief Editor :

Dr. Dhanraj T. Dhangar,

Assist. Prof. (Marathi)

MGV'S Arts & Commerce College,

Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges

UGC Approved List of Journals

You searched for research journey

Total Journals : 2

Show entries Search

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub Yevla | | 23487143 |
| | 2 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487142 |

Showing 1 to 2 of 2 entries

This Journal is indexed in :

- Dictionary of Research Journal Index (DRJI)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)

| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 23 | कोंकणी भाषा के ऐतिहासिक चरण | प्रा. नित्यानंद नायक | 112 |
| 24 | सरोजस्मृति : एक शोकगीत | डॉ. वंदना पाटील | 115 |
| 25 | कवयित्री पद्मा पाटील कृत कविता 'मिसाल': एक यथार्थ चित्रण | डॉ. गीता दोडमणी | 118 |
| 26 | जीवन के चौथेपन कि त्रासदी - 'गिलीगडू' | डॉ. कल्पना पाटील | 122 |
| 27 | 'प्रो. सुस्मिता' – शिक्षा जगत् कि विसंगतीयों का यथार्थ चित्रण | प्रा. माधवराव जोशी | 125 |
| 28 | जैनेन्द्र के उपन्यासों में नारी चित्रण | डॉ. भारत खिलारे | 129 |
| 29 | डॉ. कैलाशचंद्र शर्मा के उपन्यासों का अनुशीलन | डॉ. संजय ढोंडरे | 133 |
| 30 | निराला कि कविता | प्रा. कविता पाटील | 136 |
| 31 | शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण | प्रा.शिल्पा शेटे | 139 |
| 32 | छ. शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी केलेले कार्य | डॉ. रंजना कदम | 142 |
| 33 | आगरकर व सावरकर चारिक धागाएक वै | प्रा. संतोष शेलार | 149 |
| 34 | डॉ. आंबेडकरांची दलित चळवळ आणि आंबेडकरोत्तर चळवळ | डॉ. सुशांत चिमणकर | 155 |
| 35 | सावरकरांचे समाजकारण | प्रा. एस. सी. शेलार | 164 |
| 36 | लेडी ठाकरसी यांचे स्त्री शिक्षणातील योगदान | डॉ. अनिल पवार | 167 |
| 37 | भारतीय प्रबोधनात परदेशी महिलांचे योगदान | डॉ. माधवी खरात | 170 |
| 38 | सोशल मीडियातील महिला विषयक संदेशाचे आशय विश्लेषण (विशेष संदर्भ - व्हॉट्सॲप ग्रुप) | डॉ. विनोद नीताळे व डॉ. सुधीर भटकर | 174 |
| 39 | महिलांची आर्थिक अधिकारांविषयी जागरुकता | डॉ. सुनीता रविदास. | 179 |
| 40 | महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास महामंडळाची भूमिका | डॉ. बी. आर. गायकवाड व प्रा. ज्ञानेश्वर खोजे | 183 |
| 41 | आदिवासी स्त्रियांचे कुटुंबातील स्थान : एक सामाजिक अभ्यास | डॉ. जी. बी. लांब | 188 |
| 42 | मध्य कालीन माहूरवरील राजवटीचा अभ्यास | डॉ. दत्ता जाधव | 192 |
| 43 | महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा-सुविधांची उपलब्धता व खर्च प्रवृत्ती | डॉ. बी. आर. गायकवाड | 196 |
| 44 | विस्थापितांचे प्रश्न | प्रा. बाळकृष्ण रामटेके | 204 |
| 45 | किनवट तालुक्यातील आदिवासींच्या समस्या व उपाययोजना | डॉ. जी. बी. लांब | 209 |
| 46 | भारतातील बाजार नियंत्रण | डॉ. शहाजीराव बारके | 214 |
| 47 | कृषी पर्यटनातील अर्थ संधी | प्रा. सुलक्षणा कोळी | 218 |
| 48 | भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजना एक अभ्यास | डॉ. बी. आर. गायकवाड व प्रा. ज्ञानेश्वर खोजे | 222 |
| 49 | नोटा बंदी : एक दिव्य स्वप्न | प्रा. मनोजकुमार भोवते | 230 |
| 50 | महाराष्ट्रातील बाजार समिती | डॉ. शहाजीराव बारके | 233 |


251

बदलणे, सामाजिक रूढी परंपरा यास स्पष्टपणे विरोध करणे, महिलांचे काम आणि उत्पन्न यासंबंधी योग्य निर्णय क्षमता विस्तारणे इत्यादी गुणात्मक निर्देशक आणि यासोबत विविध विकासाभिमुख कार्यक्रमातील स्त्रियांचा सहभाग, शारीरिक आरोग्य दर्जा आणि पोषण पातळी यातील दृश्य बदल, स्त्री साक्षरतेचे प्रमाण, राजकिय प्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग यासारख्या संख्यात्मक निर्देशकाचा समावेश करण्यात आला आहे. थोडक्यात महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्री पुरूष समानतेचा स्वीकार करणे, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाची संधी देणे, तिच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण करणे, तिला सर्व क्षेत्रात विकास करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे होय.

**महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम):**

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. या धोरणाचा मुख्य हेतू हा महिला सक्षम करणे असा आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून २४ फेब्रुवारी १९७५ रोजी राज्यात महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना आहे. त्यानंतर आवश्यकतेनुसार २००१ व २०१६ मध्ये नविन महिला धोरणं जाहीर करण्यात आली आहेत. या महामंडळास २० जानेवारी २००३ पासून माविमला बचत गटाच्या माध्यमातून विविध महिला सबलीकरणाच्या योजना राबविण्यासाठी 'शिखर संस्था' म्हणून घोषित करण्यात आले. माविमने स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटासारख्या माध्यमाचा उपयोग केला आणि त्यांच्या साठी एक्सेस टू क्रेडीट, एक्सेस टू नॉलेज आणि सत्तेतील सहभागाची दारे खुली केली. माविमच्या जिल्हा कार्यालयातून स्त्री सक्षमीकरणाच्या विविध योजनांची अमंलबजावणी केली जाते. यासाठी जिल्ह्याचा प्रमुख जिल्हा समन्वयक अधिकारी व त्यासोबत प्रत्येक जिल्ह्याकरीता साधारणत: ३५ ते ४० सहयोगिनी (क्षेत्रीय कार्यकर्त्या) काम करतात. या सहयोगिनी गाव पातळीवर गट निर्मिती, मुलभूत प्रशिक्षण व गटाचे संगोपन याकडे लक्ष देतात.

मानवीय भांडवलात गुंतवणूक आणि महिलांची क्षमता संवर्धन करून, महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सबल करणे तसेच त्यांना उपजीविकेचे शाश्वत साधन उपलब्ध करून देऊन लिंगभेद नष्ट करणे आणि महिलांना समान न्याय मिळवून देणे हे माविमचे मिशन आहे. माविमचे प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.[3]

१) बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे व्यवस्थापन करणे.
२) महिलांच्या एकंदर क्षमतांचे संवर्धन करणे.
३) महिलामधील आत्मविश्वास वृद्धींगत करणे.
४) महिलांच्या उद्योजकीय विकास करणे.
५) रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठामध्ये समन्वय निर्माण करणे.
६) समान संधी, समृद्धता आणि शासनामध्ये महिलांनी स्वत:हून सहभाग घ्यावा याकरीता त्यांना प्रोत्साहन देणे.
७) शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून स्वयं सहायता गटासोबत तळागाळात काम करणाऱ्या संस्था निर्माण करणे.

**महिला आर्थिक विकास महामंडळाची कामगिरी:**

महिलांच्या सर्वांगीण विकास आणि सक्षमीकरण यासाठी शासनामार्फत व्यापक धोरणे राबविली जात आहेत. त्यासाठी मागील चाळीस वर्षापासून महिला बचतगटांची उभारणी व बळकटीकरणावर भर देत आहे. राज्याच्या ३३ जिल्ह्याच्या ३१५ तालुक्यातील जवळपास १२ लाख महिलापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहे. माविमचे स्वत:चे ९९ हजार बचतगट आहेत. बचतगटांना ४ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध होते. माविम अंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी पुढील कार्यक्रम व योजना राबविल्या जात आहेत.

**१) तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम:**

प्रस्तूत कार्यक्रमातून महाराष्ट्रात विविध योजनांतर्गत स्थापन झालेल्या बचतगटांची चळवळ निरंतर राहावी यासाठी प्रयत्न करत आहे. २०० ते २५० गटांचे मिळून एक लोक संचालित साधन केंद्र निर्माण करण्यात आली


252

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २१११८७ | १४८५० | १७१२२७ | १५०२३ | १८८०७५ |
| नागपूर | ग्रामीण | १५०७० | २१११८७ | १४८५० | ७१५५ | १४९७ | १६२३८ |
| | शहरी | २०१ | २७१४ | ११० | १८६४५२ | १६५२० | २०४२८३ |
| | एकूण | १५२७१ | २२११०१ | १५४९० | १४९१९१ | १३६२१ | १६१७८१ |
| प्रादेशिक स्वयंसेवी संस्था | | १२९५२ | १६०३११ | १२८०६ | १४६८३१ | ८७८०६ | १०७८२७६ |
| एकूण | ग्रामीण | ७९०२० | १०९२७६९ | ८१०२१ | ५६९०८ | ११२१८ | १२८८५० |
| | शहरी | २७७० | ३७८५२ | ६२०३ | १००३७३९ | ९९०२४ | १२०७०९६ |
| | एकूण | ८१७९० | ११३०६२१ | ८७२२४ | | | |

आधार: महिला आर्थिक विकास महामंडळ अहवाल २०१६–१७, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०१७–१८.

तक्ता क्र. १ वरून महाराष्ट्रामध्ये २०१५–१६, २०१६–१८ आणि २०१७–१८ या तीन वर्षासाठी महिला स्वयं सहायता गटाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, राज्यातील २०१५–१६ या वर्षाच्या तुलनेत २०१७–१८ यावर्षी ग्रामीण भागात स्वयं सहायता गटाची संख्या ७९०२० इतकी होती त्यात ११ टक्के वाढ होऊन ८७८०६ एवढी झाली. तर गटाची सदस्य संख्या १०९२७९ इतकी होती त्यात १.३२ टक्के घट होऊन १०७८२७६ एवढी कमी झाली आहे. तसेच शहरी भागामध्ये स्वयं सहायता गटाची संख्या २७७० वरून ३०१ टक्के दराने वाढ होऊन ११२१८ एवढी झाली आहे. तर गटाची सदस्य संख्या ३७८५२ वरून २४० टक्क्याने वाढ होऊन १२८८५० इतकी झाली आहे. एकूण राज्याचा विचार केला असता २०१५–१६ या वर्षाच्या तुलनेत २०१७–१८ मध्ये स्वयं सहायता गटाची संख्या ८१७९० वरून ९९०२४ (२१ टक्के) इतकी वाढ झाली. तर गटाच्या सदस्य संख्येत ११३०६२१ वरून १२०७०९६ (७ टक्के) वाढ झाली आहे. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण भागातील स्वयं सहायता गटाच्या संख्येत वाढ झाली आहे. मात्र सदस्य संख्येत १.३२ टक्के घट झालेली दिसून आली. ग्रामीण भागातील महिलांना बचत गटाविषयी असलेली अल्प जागरूकता, शिक्षणाचे अल्प प्रमाण, उत्पन्न साधनांचा अभाव, रोजगाराच्या अल्प संधी यासारख्या कारणांमुळे सदस्य संख्येत घट झालेली दिसून येते. स्वयं सहायता गटाची संख्या व सदस्य संख्या या दोहोच्या बाबतीत ग्रामीण महिलापेक्षा शहरी भागातील महिलांचे प्रमाण अधिक दिसून आले आहे. असे असले तरी एकंदरीत विचार करता राज्यामध्ये स्वयं सहायता गटाची संख्या व सदस्य संख्या यांतील वाढ अतिशय कमी असल्याचे दिसून आले आहे.

माविम अंतर्गत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला स्वयं सहायता गटांची बचत व त्यांना वितरीत करण्यात आलेली अंतर्गत कर्ज हे २०१७–१८ मध्ये डिसेंबरपर्यंत अनुक्रमे १३६.४८ कोटी रूपये व २०४.४६ कोटी रूपये करण्यात आलेले आहे. तसेच २०१७–१८ मध्ये डिसेंबरपर्यंत स्वयं सहायता गटांना विविध वित्तीय संस्थाकडून २८३.०८ कोटी कर्ज देखील प्राप्त झाले आहे. अलीकडे महाराष्ट्र शासनाने राज्यांतील महिला बचत गटांना बिनव्याजी कर्ज देण्यासाठी तयारी दर्शविली आहे.[६]

माविमने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयं सहायता गट हे चांगले माध्यम असल्याने गटाच्या माध्यमातून स्व–रोजगार निर्माण करणे, महिलांना आपल्या हक्कासंबंधी जाणीव निर्माण करणे, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देणे, आत्मविश्वास निर्माण करणे, सत्ता सहभाग वाढविणे यासारख्या कामावर भर देत आहे. माविम हे 'एकजुटीतून अवतरेल समृद्धीची नवप्रभा' हे ब्रीद वाक्य सोबत घेऊन महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहे.

संदर्भसूची:

१. प्रा. प्रकाश बुरूटे (२०१२), लेख–भारतातील महिला सबलीकरण:सद्यस्थिती, योजना मासिक, अंक ११, वर्ष ३९, जून